● शनिवार, दि. ७ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १२९ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# सकाळी ९ वाजेपूर्वी चौथीपर्यंतचे वर्ग भरविणाऱ्या शाळांवर होणार कारवाई

## शिक्षणाधिकाऱ्यांचे आदेश; मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या पाठपुराला यश

**जालना । प्रतिनिधी -** सर्व माध्यमांच्या चौथीपर्यंतच्या शाळा सकाळी ९ वाजेपूर्वी न भरविता ९ वाजता अथवा त्यानंतर भरविण्याच्या दि. ८ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी; अन्यथा तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी दिल्यानंतर शिक्षण विभाग खडबडून जागा झाला असून, चौथीपर्यंतचे वर्ग ९ वाजता किंवा त्यानंतरच भरविण्यात यावेत; असे आदेश जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कैलास दातखिळ यांनी आज शुक्रवार दि. ६ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत.

सकाळी ९ वाजेपूर्वी म्हणजे सात वाजेपासून वर्ग भरविणाऱ्या सर्व माध्यमांच्या शाळांमुळे विद्यार्थ्यांची पुरेशी झोप होत नाही. त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो, असे एका निरीक्षणातून लक्षात आल्याने शासनाच्या शिक्षण विभागाने ८ फेब्रुवारी रोजी शासन आदेश जारी केला होता. मात्र, त्याची अंमलबजावणी होत नसल्याने मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी आक्रमक भूमिका घेत त्यांच्यासह जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष चव्हाण, युवक जिल्हाध्यक्ष ॲड. शैलेश देशमुख, कामगार आघाडीचे अंबड तालुका अध्यक्ष मोबीन बागवान, युवक काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष संतोष जाधव, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ जोगदंड यांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्यांना दि. २६ नोव्हेंबर रोजी निवेदन देऊन शासन निर्णयानुसार सर्व माध्यमांच्या शाळा, शिक्षण संस्थांवर कारवाई करावी; अन्यथा मराठा महासंघाच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला होता. त्याची शिक्षण विभागाने दखल घेऊन आज ६ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना शासनाच्या परिपत्रकाची अंमलबजावणी करावी आणि सकाळी ९ वाजेपूर्वी चौथीचे वर्ग भरविण्यात येऊ नयेत, याबाबत सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना अवगत करण्यास सांगितले आहे. आदेशाचे पालन न केल्यास होणाऱ्या परिणामांची जबाबदारी शाळा व्यवस्थापनावर राहील, असे त्यात नमूद करण्यात आले आहे.

शिक्षण विभागाच्या या पत्राची एक प्रत माहितीस्तव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व मुख्याध्यापक आणि शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी पाठपुरावा करणारे मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांना पाठविण्यात आली आहे.

### पालक आणि विद्यार्थ्यांची कसरत थांबणार - देशमुख



याबाबत अरविंद देशमुख म्हणाले की, सकाळी सात वाजता शाळेमुळे विद्यार्थ्यांना सहा वाजताच उठावे लागते. मुलांचा डब्बा, त्यांची तयारी यासाठी पालकांनाही कसरत करावी लागते. झोप होत नसल्याने विद्यार्थ्यांची चिडचिड होते, मानसिक आणि शारीरिक आरोग्यावरही परिणाम होतो. पावसाळा, हिवाळा, बदलेले वातावरण यांमध्ये लहान विद्यार्थांना शाळेत जावे लागते. या वातावरणमूळे लहान विद्यार्थ्यांना त्रास होतो व पालकांची देखील धावपळ होते. त्यामुळे शासनाने सकाळी नऊ वाजे पूर्वी चौथीपर्यंतचे वर्ग भरवू नयेत, असा शासन निर्णय जाहीर केला होता. अंमलबजावणी होत नसल्याने मराठा महासंघाने आक्रमक भूमिका घेतल्याने शिक्षण विभागाने शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे आदेश काढल्याने आता विद्यार्थ्यांची झोपमोड आणि पालकांची धावपळ होणार नाही. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक आरोग्यावर निश्चितच सकारात्मक परिणाम झालेला दिसून येईल, असे सांगून अरविंद देशमुख यांनी दखल घेतल्याबद्दल शिक्षणाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत. आदेशाचे पालन न करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे



शुक्रवार (दि ६) रोजी सकाळी सहा वाजेच्या सुमारास शहरात पावसाने हजेरी लावली. धुकाचे वातावरण होते. (छायाचित्र - किरण खानापुरे)

# बांधकाम व्यावसायिक व भूमी अभिलेख यांच्यात सुसंवाद महत्त्वाचा - कृष्णाजी शिंदे

## जालना क्रेडाईतर्फे सिटी सर्व्हे, मोजणी व पीआर कार्डबाबत चर्चासत्र

**जालना । प्रतिनिधी -** बांधकाम व्यावसायिक आणि भूमी अभिलेख कार्यालय यांच्यात सुसंवाद असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विभागाच्याही काही अडचणी, कार्यालयीन मर्यादा असतात. अशा प्रसंगी थोडा संयम ठेवल्यास त्यातूनच अनेक समस्या आणि अडचणीवर मार्ग काढता येतो. यासाठीच शासन सर्व अभिलेखे डिजिटल करण्याचा विशेष कार्यक्रम राबवित आहे. या माध्यमातून सर्व प्रकारचे अभिलेख, नकाशे, **पान २ वर**



युवा आदर्श

**तोरण ...**

मोट तीन रे पक्षांची
मैत्रीचे ना विस्मरण
महाशक्ती असताना
डगमगू नयेत चरण
गडगंजाच्या दाराला
सगळेबांधती तोरण
वंचिताच्या अडचणी
कुणीचं नसते तारण
आश्वासन कर्ज घेता
विश्वासा ठेवी तारण
लुटूनजाई गंगाजळी
बँक बुडतीचे कारण
बेगडी प्रसिद्धीसाठी
झगमग ना आवरण
पारदर्शक कारभारी
प्रस्तुत करा विवरण
कायदा वचक कडक
गुन्ह्याला आण शरण
दोषी करती सुंबाल्या
परदेशी वळती चरण
नको घोळात बोलणे
नि:संदिग्ध व्याकरण
जनता सतर्क आता
पाहते कसे आचरण

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्साहात

# समुह लोकगीतमध्ये मत्स्योदरी महाविद्यालय तर समुह लोकनृत्यात उत्कर्ष थेटर्स डान्स ग्रुप अव्वल

**जालना । प्रतिनिधी -** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व युवा कार्यक्रम मंत्रालय भारत सरकार अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद आणि नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२४-२५ उत्सवात संपन्न झाला.





येथील शासकीय ओद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आयोजित जिल्हास्तर युवा महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते पार पडले. यावेळी पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सूर्यवंशी, शाहीर रामानंद उगले , जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे, जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर प्राचार्य आयटीआय कॉलेज प्राध्यापक डॉ. प्रवीण उखळीकर जिल्हा समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना प्राध्यापक डॉ. सोमीनाथ खाडे क्रीडा अधिकारी डॉ. रेखा परदेशी ,श्रीमती आरती चिल्लारे, क्रीडा मार्गदर्शक सिद्धार्थ कदम, राहुल गायके आदी उपस्थित होते.

या जिल्हास्तरीय महोत्सवांमध्ये समूह लोकनृत्य, **पान २ वर**

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त भाजपा जालनाच्या वतीने अभिवादन

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस भारतीय जनता पार्टी, जालनाच्या वतीने भाजपा जिल्हा कार्यालय व मस्तगड येथे भाजपा जालना महानगराध्यक्ष सतीष जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी महानगराध्यक्ष सतीष जाधव म्हणाले की, भारतातील असमानतेच्या लढ्याला आकार आणि दिशा देण्याचे भरीव योगदान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. सर्वांना शिक्षणाच्या समान संधी मिळाव्यात यासाठी सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणादायी ठरले. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा वारसा त्यांच्या साहित्य, कार्य आणि संविधानरुपात संपूर्ण देश जपतो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आजही जगण्याच्या एक नवा दृष्टिकोन व दिशा देतात. आजच्या महापरिनिर्वाणदिनी या ज्ञानसूर्यास कोटी कोटी वंदन.



याप्रसंगी भाजपा जालना महानगराध्यक्ष सतीष जाधव, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, सिद्धेश्वर हजबे, महेश निकम, सुनील पवार, सुभाष सले, सुमीत सुरडकर, रामलाल जाधव, राजू गवई, अभिजित अंभोरे, शरद सोनुने, जगदीश येनगुपटला, सागर वाहुळकर, स्वीय सहायक गोवर्धन कोल्हे, **पान २ वर**



जुना जालना भागातील विठ्ठल मंदीर ते देहेडकरवाडी रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. (छायाचित्र - किरण खानापुरे)

# संपादकीय पान

## महिला आमदारांची संख्या नगण्य

भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. चूल आणि मूल ही महिलांची जुनी ओळख आता पुसली गेली आहे. महिला आज कोणत्याच क्षेत्रात मागे नाहीत. सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहे म्हणूनच सर्व क्षेत्रात महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले आहे मात्र एक क्षेत्र असे आहे ज्यात आजही महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही ते क्षेत्र म्हणजे राजकारण. राजकारणात आजही महिला लोकप्रतिनिधींची संख्या पुरुषांच्या तुलनेत अतिशय नगण्य आहे आता हेच पहा ना नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिंकून आलेल्या महिला आमदारांची संख्या अतिशय नगण्य आहे. २८८ जागांसाठी एकूण २५० महिलांनी निवडणूक लढवली पण निवडून आल्या फक्त २१ महिला. याचाच अर्थ एकूण आमदारांपैकी महिला आमदारांची संख्या फक्त ७.२९ टक्के इतकी आहे. विशेष म्हणजे गेल्या विधानसभेत निवडून आलेल्या आमदारांची संख्या यापेक्षाही अधिक होती. मागील विधासभेत २४ महिला आमदार निवडून आल्या होत्या यावेळी ती संख्या ३ ने घटली आहे. यावेळी निवडून आलेल्या महिला आमदारांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या सर्वाधिक १४ महिलांचा समावेश आहे. शिवसेना ( शिंदे ) गटाच्या २, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या ४ आणि काँग्रेसची १ महिला आमदार म्हणून जिंकून आली आहे. इतर पक्षामध्ये निवडून आलेल्या महिला आमदारांची संख्या शून्य आहे. वास्तविक ज्या देशात पंतप्रधान आणि राष्ट्रपती अशी महत्वाची पदे ज्या महिलांनी भोगली त्या देशात महिला लोकप्रतिनिधींची नगण्य संख्या भारतासारख्या पुरोगामी देशाला भूषणावह नाही. भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु या महिला आहेत. डॉ प्रतिभा ताई पाटील या देखील भारताच्या राष्ट्रपती राहिल्या आहेत. इंदिरा गांधी या महिला पंतप्रधानाने सर्वाधिक काळ देशाचे पंतप्रधानपद भूषवले. नुसतेच भूषवले नाही तर यशस्वीरीत्या सांभाळले आणि महिलांकडे देशाचे नेतृत्व दिले तर महिला काय करू शकतात हे दाखवून दिले. महिलांना जर राजकारणात पुरेसे प्रतिनिधित्व दिले तर महिला त्यांना दिलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकतात हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. देशात अशा अनेक महिला आहेत की ज्यांनी आपल्या नेतृत्वाने देशपातळीवर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यात इंदिरा गांधी तर आहेतच पण त्यांच्यासोबत दिवंगत जयललिता, सुषमा स्वराज, शिला दीक्षित, ममता बॅनर्जी, उमा भारती, मायावती , वसुंधरा राजे यांनी आपापल्या राज्याचे मुख्यमंत्रीपद यशस्वीपणे सांभाळले. अनेक महिलांनी राज्यांचे राज्यपालपद भूषवले. महाराष्ट्रातून सुप्रिया सुळे, रक्षा खडसे या खासदारांनी राष्ट्रीय राजकारणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे याचाच अर्थ जर राजकारणात महिलांना पुरेशी संधी मिळाली तर त्या त्यात यशस्वी होतात. दुर्दैवाने महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात आजही महिला आमदारांची संख्या अतिशय नगण्य आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात अजून एकदाही महिला मुख्यमंत्री बनू शकली नाही यासारखी दुसरी शोकांतिका नाही. मुख्यमंत्रीच कशाला ? अगदी मंत्री बनणाऱ्या महिलांची संख्या देखील हाताच्या बोटावर मोजता येईल इतकीच आहे. मागील मंत्रिमंडळात तर अदिती तटकरे या एकमेव महिला मंत्री होत्या. यावेळी तरी ही संख्या वाढून मंत्रिमंडळात महिलांना पुरेसा स्थान मिळून त्यांचा योग्य मान राखला जाईल अशी अपेक्षा आहे. राजकारणात महिलांना ५० टक्के आरक्षण मिळावे अशी मागणी केली जाते त्या मागणीला सर्वच राजकीय पक्ष पाठिंबा देतात मात्र त्यासाठी पुढाकार घेण्याचे टाळतात. राजकारणात ५० टक्के आरक्षण मिळाले तर महिला राजकारणात आपल्या कर्तृत्वाचा झेंडा रोवतील यात शंका नाही. नाही म्हणायला स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ३३ टक्के आरक्षण आहे त्याचा फायदा महिलांना मिळाला आहे. ग्रामपंचायतिच्या सरपंचापासून जिल्हा परिषद अध्यक्ष, महापौर अशी महत्वाची पदे महिलांनी यशस्वीपणे भूषवली आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेप्रमाणे लोकसभा आणि विधानसभेतही महिलांना आरक्षण मिळाले तर महिला तिथेही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवतील यात शंका नाही.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## भारतीय बौध्द महासभेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना



**जालना । प्रतिनिधी -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शुक्रवार दि. ६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता भारतीय बौध्द महासभेच्या समता सैनिक दलाच्या वतीने मस्तगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन मानवंदना देण्यात आली. यावेळी जालना जिल्हाध्यक्ष महेंद्र बनकर, सरचिटणीस राजेश सदावर्ते, महिला संरक्षण उपाध्यक्ष करुणाताई साळवे, वंचित बहुजन आघाडीचे हरीश रत्नपारखे, रमाताई होरशील, भोकरदन तालुका अध्यक्ष सूर्यभान घोरपडे, गुमानराव पारखे, प्रभाकर हिवाळे, परमेश्वर ससाणे, योगिता ससाणे, रत्नमाला साळवे, सोमनाथ घोरपडे, कैलास घोरपडे, प्रल्हाद घोरपडे, अशोक साळवे, सुनीता हिवाळे, रमाताई हिवाळे, सुषमा साळवे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन...







**डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिर्वाण दीन निमीत्त विविध पक्ष आणि संघटनातर्फे अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी आमदार कैलास गोरंट्याल, माजी मंत्री राजेश टोपे, बबलु चौधरी, शिवसेना (उद्धव ठाकरे) जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर, दुर्गेश काठोठीवाले, शेख महेमुद, नंदा पवार, गणेश चांदोडे आदींनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. (छाया- जावेद तंबोली)**



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त एक पेन आणि एक वही अभियानास प्रतिसाद

**जालना । प्रतिनिधी -** डॉ. बाबासाहेंब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जालना शहरातील मस्तगड येथील डॉ. बााबसाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ फेस ऑफ आंबेडकराईट मुव्हमेंट (फॅम) च्या वतीने गुरुवार दि. ६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजेपासून एक पेन आणि एक वही या अभियानास सुरुवात करण्यात आली होती. दरम्यान या अभियानास नागरीकांनी प्रचंड प्रतिसाद दिला.

विश्वरत्न परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त फेस ऑफ आंबेडकराईट मूव्हमेंटच्या (फॅम) च्या वतीने एक वही आणि एक पेन अभियान राबविण्यासाठी विनोद फकीरा वाघ यांनी सकाळपासून स्टॉल लावला होता. दरम्यान अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात आले. हे अभियान महाराष्ट्रात स्थापन होऊन १० वर्ष पूर्ण झाले असून मागील वर्षी जालना शाखेच्या वतीने नगर परिषद शाळा, टि. व्ही. सेंटर येथे वही आणि पेन वाटप करण्यात आले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आंबेडकरी अनुयायी अभिवादन करण्यासाठी हार-फुले वाहून, मेणबत्ती प्रज्वलित करून आदरांजली वाहतात. ते दुसर्या दिवशी उपयोगाचे न राहता कचरा म्हणून वाया जाते. शिवाय भारताच्या सर्व सामाजिक दुखण्यांवर शिक्षण हेच प्रभावी औषध आहे असे स्वत: बाबासाहेब सांगून गेले आहेत. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सांगण्याप्रमाणेच हे अभियान सुरु करण्यात आले आहे.

आज भारतात शिक्षणातून विद्यार्थी गळतीचे प्रमाण प्रचंड आहे. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवणे आवश्यक आहे. शेतकरी, कष्टकरी, कामगाराचे विद्यार्थी शैक्षणिक सुविधा अभावी शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडत आहेत. बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी किमान २० ते ३० रुपयांचे हार-फूल घेतो, परंतु, तसे न करता बाबासाहेबांच्या अनुयायांनी त्याच मूल्याचे एक वही व एक पेन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन म्हणून फॅम कडे जमा करा असे आवाहन करण्यात आले होते. त्यास नागरीकांनी प्रतिसाद देत वह्या आणि पेनाचे दान करण्यात आले तर काहींनी आर्थीक रुपाने मदत करुन सहभाग नोंदविला.



फॅम ते सर्व साहित्य अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवेल आणि त्यांच्या शिक्षणाला हातभार लावेल असे विनोद वाघ यांनी म्हटलंय. या अभियानास माजी आमदार मा. कैलास गोरंटयाल, माजी आमदार अरविंद चव्हाण, शेख महमूद, पोलीस निरीक्षक एस. जे. माने, पीएसआय नागरे, एन. आर. जावडे, प्राचार्य, डॉ. ए. डब्ल्यू. नेमाडे, प्रा. उन्मेष हिवराळे, फकीरा वाघ, सुमित बोर्डे, सचिन पगारे, किशोर जाधव, सुशील सूर्यवंशी, रिंकल तायड यांनी भेट देत सहभाग नोंदविला. सदरील अभियान यशस्वी करण्यासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र तुंबाकले, भगवान तायड, विनोद भगत आदींनी परिश्रम घेतले.

पान १ वरुन

## बांधकाम व्यावसायिक ...

मोजणीसाठीचे अर्ज ऑनलाईन होणार आहे. सर्वेक्षण आणि नकाशे अद्ययावत होणार असून, पारंपरिक नकाशांची जागा डिजिटल नकाशे घेणार आहे. डिजिटायझेशनमुळे घरबसल्या सर्व प्रकारचे अभिलेखे मिळणार असल्याने त्रास आणि समस्या दूर होणार होणार आहे, अशी माहिती भूमी अभिलेख जिल्हा अधीक्षक कृष्णाजी शिंदे यांनी येथे बोलताना दिली.

बांधकाम व्यवसायाची सुरूवात जमीन मोजणीपासून होते व शेवट पी.आर. कार्डने होतो. या प्रक्रियेत सर्वात जास्त अडचणी भूमिअभिलेख विभागात येतात. त्या अनुषंगाने बांधकाम व्यावसायिकांच्या समस्यांची जाणीव करून देण्यासह त्यावर मार्ग काढण्यासाठी जालना क्रेडाईने गुरुवार दि. ५ डिसेंबर रोजी हॉटेल सेफ्रोनमध्ये आयोजित केलेल्या चर्चासत्रात श्री. शिंदे बोलत होते. व्यासपीठावर भूमी अभिलेख तालुका अधीक्षक शिवप्रसाद श्रीवास्तव, क्रेडाईचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, उपाध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार, सचिव अविनाश भोसले यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना श्री. शिंदे म्हणाले की, बांधकाम व्यावसायिकांचा सर्वात जास्त संबंध आमच्या कार्यालयाशी येतो. त्यामुळे त्यांच्या समस्या आणि अडचणी जाणून घेऊन त्यावर सकारात्मक मार्ग काढण्यासाठी आपण मुद्दामहून येथे आलो आहोत. जालना महानगरपालिका म्हणून अस्तित्वात आल्यानंतर हद्दवाढ झाली. नागेवाडी पूर्ण आणि दरेगावची काही गट नंबर महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झाले. सन १९७५ झालेला सर्वेनुसार जालना शहरात १० हजार ८५२ प्रॉपर्टी होत्या. आता २०२४ मध्ये ही संख्या ४५ हजार २६० एवढी वाढली आहे. मोजणीसाठी अर्ज केल्यानंतर ऑनलाइन मोजणीची तारीख दर्शविली जात नसल्याचा प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आला असता, ही बाब राज्य जमाबंदी कार्यालयाकडे कळवून त्याचा फीडबॅक घेतला जाईल. फेरफार मंजुरीसाठी ४२ दिवसाची कालमर्यादा असून ती २५ दिवसावर आणण्याचा शासनाचा प्रयत्न सुरू आहे. बांधकाम व्यावसायिक आणि सर्वांसाठीच आता भूमी अभिलेखशी संबंधित कामे तात्काळ मार्गे लावण्यासह भूखंडाच्या मालकी हक्काचे अचूक दस्तऐवजीकरण तयार करणे तसेच जमिनीशी संबंधित वाद कमी करणे यासाठीभूमी महाराष्ट्र शासनाचा महत्वाकांक्षी विशेष कार्यक्रम राबविला जात असून, त्यासाठी ७ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या अभिलेखे स्कॅनिंगचे काम सुरू आहे. १ जानेवारी २०२५ पासून पारंपरिक नकाशांची जागा डिजिटल नकाशे घेणार आहेत. सर्व जमिनीची मालकीची नोंद डिजिटल स्वरूपात ठेवली जाऊन रेकॉर्ड ऑनलाइन उपलब्ध होतील. दस्तऐवजांमधील त्रुटी दूर करून वाद कमी केले जातील. जमिनीशी संबंधित नोंदी, खरेदी-विक्री व्यवहार, वारसा हक्क, वर्गीकरण व इतर प्रक्रियांसाठी ऑनलाईन सेवा उपलब्ध होईल व जमिनीच्या अचूक मालकीची नोंद असल्याने मालकीबाबत होणारे वाद आपोआप टळतील. अचूक डिजिटल नोंदी असल्याने बेकायदेशीर जमिनी बळकावणे किंवा फसवणूक करण्याच्या प्रवृत्तीला आळा बसेल. प्रत्येक प्रॉपर्टीला आयडेंटिफिकेशन मिळणार असल्याने ती प्रॉपर्टी जगाच्या पाठीवर कुठे आहे, हे जी एस प्रणालीमुळे कळणार आहे. डिजिटल प्रणालीमुळे जमीन व्यवस्थापन अधिक पारदर्शक, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि लोकाभिमुख होईल, आशा विश्वास श्री. शिंदे यांनी व्यक्त केला.

जुन्या पीआर कार्डमध्ये काही बदल होणार नाहीत. फक्त लोकेशन निश्चित केले जाणार आहे. बऱ्याच अशा जागा आहेत की सर्वे नंबर पडलेले नाहीत. तेथे प्रथम मोजणीचे काम केले जाईल सर्वे नंबरची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. एकाच मिळकतीला दोन मिळकत नंबर असल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. यावर निर्णय घेताना कुणावरही अन्याय होऊ न देता चुकून नंबर पडला असेल तर दुरुस्ती केली जाईल, या डुप्लिकेट नंबरची फिल्टरिंग करून प्रत्येक मिळकतीचे आयडेंटिफिकेशन केले जाईल, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविकपर भाषणात जालना क्रेडाइचे अध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी या चर्चासत्राचा उद्देश विशद करून, बांधकाम व्यावसायिकांच्या समस्या आणि अडचणी मांडल्या. भूमी अभिलेख जिल्हा अधीक्षक श्री. शिंदे आणि तालुका भूमि अभिलेख अधीक्षक श्रीवास्तव या चर्चासत्राला उपस्थित राहुन दिलेला सकारात्मक प्रतिसाद बांधकाम व्यवसायिकांच्या अडचणी दूर करण्यात मोलाची भूमिका पार पडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या चर्चासत्राला जालना क्रेडाईचे पदाधिकारी, सदस्य अभियंते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन क्रेडाईचे उपाध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार यांनी केले.

## समुह लोकगीत ...

समूह लोकगीत, कविता लेखन, कथालेखन ,वक्तृत्व स्पर्धा, विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नव संकल्पना व युथ आयकॉन इत्यादी बाब असून विजयी स्पर्धकांना रोख पारितोषिक प्रमाणपत्र व ट्रॉफी असून यामध्ये प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक काढले आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल गायके , किशोर नावकर, अमर लोंढे , प्रा. शाम चव्हाण ,श्री प्रा. सतीश मगरे आदी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले आहे. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सर्व स्पर्धकांनी कलाक्षेत्रात आपले नाव उज्वल करावे अशा प्रकारच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे व जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर यांनी केले. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालन मिलन सावंत यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉक्टर रेखा परदेशी यांनी केले.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विजयी झालेल्या कलाकारांना प्रमाणपत्र व पारितोषिक व रोख रक्कम देण्यात आले. बक्षिस वितरणसाठी प्रा. बसवराज कोरे व शिक्षणाधिकारी श्रीमती मंगल धुपे , संजय गाढवे आदी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

**अंतिम निकाल खालीलप्रमाणे आहे.**

१.कला प्रकार -:-समुह लोकगीत -प्रथम- मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड, ता. अंबड, जि.जालना, द्वितीय- जे.ई.एस.महाविद्यालय,जालना, तृतीय- मॉडर्न कॉलेज ,घनसावंगी

२.कला प्रकार -:-समुह लोकनृत्य़- प्रथम- उत्कर्ष थेटर्स डान्स. ग्रुप, जालना, द्वितीय- मत्स्योदरी महा.अंबड, तृतीय- मॉडर्न कॉलेज ,घनसावंगी

३.कला प्रकार:- वक्तृत्व स्पर्धा -प्रथम- आदिती अरविंद सुरंगळीकर, द्वितीय- धनश्री संजय टेकाळे, तृतीय-सुचित संतोष शिंदे

४.कला प्रकार:- वक्तृत्व स्पर्धा -प्रथम- आदिती अरविंद सुरंगळीकर, द्वितीय- धनश्री संजय टेकाळे, तृतीय-सुचित संतोष शिंदे

५.कला प्रकार-चित्रकला- प्रथम- प्रिया तातेराव दुर्गुळे, द्वितीय- करण मनोहर जगताप, तृतीय-हर्षा युवराज चव्हाण

६.कला प्रकार -कथालेखन - प्रथम- शिवप्रसाद अनिल नागवे, द्वितीय- हर्षल प्रविणकुमार उखळीकर, तृतीय-गोपाल उत्तम़राव तौर

७.कला प्रकार-कवितालेखन- प्रथम- स्वप्नील सोपान खरात, द्वितीय- राहूल महादेव कासोदे, तृतीय-योगेश बाबासाहेब खोसे

८.कला प्रकार-सायन्स.मेला-प्रथम- पार्थ उध्दव घुमरे, द्वितीय- कार्तिक ऋषिधर शिंदे, तृतीय-महिमा नितीन भुरेवाल

९.कला प्रकार-सायन्स. मेला-प्रथम- आय टी आय कॉलेज ,जालना, सामुहीक द्वितीय- एम एस एस कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ,जालना, तृतीय-एम एस एस कॉलेज ऑफ अंबड.

## भारतरत्न डॉ. ...

राजेश जोशी, मुकेश राठोड, महेश मुळे, मदन गवारे, कैलास सोळुंके, गोवर्धन उबाळे, शाम उगले, गोविंद चौरे, लक्ष्मण वर्मा, विठ्ठल नरवडे, इत्यादीसह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जालना शहरात अभविपच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर




**जालना । प्रतिनिधी -** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद जालना शाखेच्या वतीने ६ डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले.

या कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रतिमा पूजन करण्यात आले.यावेळी अभाविप कार्यकर्ते व जनकल्याण रक्तपेढीतील डॉक्टर उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभाविप जालना शाखेचे शहर मंत्री गणेश बोंडे , जिल्हा सहसंयोजक ,प्रतीक कुलकर्णी, अनुराग संगमळी, सचिन उगले, सिद्धेश्वर कळकुंबे , सोहम लांडगे, अजय मस्के, कृष्णा जाजूरे, ओमकार आरदाड,व यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

### घनसावंगी येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांच्या महामेळाव्याचे आयोजन

## नागरिकांनी महामेळाव्याचा लाभ घ्यावा - जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** नागरिकांना विविध शासकीय योजना व विधी सेवांबाबतची माहिती व लाभ देण्यासाठी जालना जिल्हा प्रशासन आणि जालना विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांच्या महामेळाव्याचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा. एम. मोहिते यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील नागरिकांना महाराष्ट्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, कायदे विषयक विविध कल्याणकारी योजना, गुन्ह्यातील पिडीत व्यक्तींसाठी नुकसान भरपाईच्या योजना आणि मोफत कायदे विषयक सल्ला देण्यासाठी जालना जिल्हा प्रशासन आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १५ डिसेंबर, २०२४ रोजी आयटीआय, घनसावंगी, जि. जालना येथे सकाळी १०:३० वा. विधी सेवा महाशिबीर व शासकीय सेवा आणि योजनांच्या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्याचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा जालना जिल्हा पालक न्यायमुर्ती संदीपकुमार सी. मोरे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा एम. मोहिते, जिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, पोलीस अधिक्षक अजयकुमार बसंल, जालना जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड बाबासाहेब इंगळे, जालना जिल्हा वकील संघाचे ॲड विकास टी. पिसुरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या महामेळाव्याच्या माध्यमातून जिल्ह्यातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती व्हावी. तसेच कायदेविषयक जनजागृती व्हावी, याकरिता न्यायालय, महसुल, पंचायत, कृषी, नगर प्रशासन, पोलीस, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अण्णासाहेब पाटील विकास महामंडळ, महिला अर्थिक विकास महामंडळ, महिला बाल विकास विभाग, समाज कल्याण जिल्हा परिषद, पंतप्रधान स्वनीधी योजना, आरोग्य विभाग, सामाजिक संस्था आदी अशा प्रकारचे विविध शासकीय विभागांचे स्टॉल्स या महामेळाव्यात उभारण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातील जास्तीत-जास्त नागरिकांनी या महामेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा. एम. मोहिते, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर प्रणिता भारसाकडे-वाघ, उपजिल्हाधिकारी (सा.) तथा अंबड उपविभागीय अधिकारी नम्रता चाटे, घनसावंगी तालूका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश क स्तर सी.एस जगताप, घनसावंगी वकील संघाचे अध्यक्ष ॲड दिपक शिवतारे यांनी केले आहे.


## श्री दत्त जयंती शास्त्रीय संगीताचा शताब्दी महोत्सव


### अंबड येथे तीन दिवसीय उत्सवात दिग्गज कलावंत होणार सहभागी

**अंबड । प्रतिनिधी -** दिवंगत श्री त्रिंबकराव जळगावकर यांनी सुरू केलेला आणि गायनाचार्य पंडित गोविंदराव जळगावकर यांनी स्वरसातत्याने जोपासलेला शतकपूर्ती दत्त जयंती संगीत महोत्सव येत्या दि. १३, १४ आणि १५ असा तीन दिवस आणि पाच सत्रात अंबडला होणार आहे. या शताब्दी महोत्सवात दिग्गज कलावंत सहभागी होणार आहेत. संयोजकांकडून या महोत्सवाची जय्यत तयारी सध्या सुरू आहे.

अंबड नगरपरिषदेच्या गायनाचार्य पंडित गोविंदराव जळगावकर नाट्यगृहात होणाऱ्या या संगीतोत्सवाचा प्रारंभ शुक्रवारी (दि.१३) सायंकाळी साडेसहाला नांदी गायनाने होणार आहे. त्यानंतर उद्घाटन समारंभ होईल. पहिल्या सत्राचा प्रारंभ शिवम तोडकर यांच्या सनई वादनाने होईल. त्यानंतर नागेश आडगावकर (पुणे ) यांचे गायन, यशवंत वैष्णव (मुंबई) यांचे एकल तबलावादन, पार्वती दत्ता (छत्रपती संभाजीनगर ) यांचे कथ्थक नृत्य होईल. तर पं. रोणू मुजुमदार (मुंबई ) यांचे बासरीवादन आणि पं. उल्हास कशाळकर ( मुंबई ) यांच्या गायनाने या सत्राचा समारोप होईल.

महोत्सवाचे दुसरे सत्र शनिवारी (दि.१४) सकाळी नऊ वाजता नांदी गायनाने सुरू होईल, शंकर गिरी ( अंबड ) यांचे गायन, नितीश पुरोहित (पुणे) यांचे सरोद वादन , डॉ.वैशाली देशमुख ( छत्रपती संभाजीनगर) तसेच कुमार मर्डुर (धारवाड) यांचे गायन होईल. तिसरे सत्र सायंकाळी साडेसहाला नांदीने सुरू होईल, त्यानंतर आसावरी देगलूरकर-देसाई (पुणे ) तसेच ईश्वर घोरपडे ( पुणे ) यांचे गायन होईल. शांतिभूषण देशपांडे (छत्रपती संभाजीनगर) यांचे एकल संवादिनी वादन, पं.राजेंद्र कुलकर्णी आणि पं. प्रमोद गायकवाड (पुणे) यांचे बासरी आणि सनई सहवादन आणि पं. राम देशपांडे ( मुंबई ) यांच्या गायनाने या सत्राचे समापन होईल.









महोत्सवाचे चौथे सत्र रविवारी (दि.१५) सकाळी ९ वाजता नांदी गायनाने सुरू होईल, त्यानंतर दिनेश संन्यासी (जालना ) यांचे गायन, सचिन नेवपूरकर (छत्रपती संभाजीनगर), अभिषेक काळे (सांगली), पं. सुनील कुलकर्णी (दिल्ली) यांचे गायन होईल. पंकज विशाल (दिल्ली) यांचे सतार वादन होईल, विदुषी कलापिनी कोमकली (देवास ) यांच्या गायनाने सत्राचा समारोप होईल. तर पाचव्या सत्राला सायंकाळी साडेसहाला वाजता नांदी गायनाने प्रारंभ होईल त्यानंतर विक्रांतजी वायकोस , कलाश्री अकादमीचे शिष्यगण (छत्रपती संभाजीनगर) यांचे भरत नाट्यम, रितेश आणि रजनीश मिश्रा (वाराणसी ) यांचे सहगायन , फारुक लतीफ (मुंबई) यांचे सारंगी वादन , पं.विश्वनाथ दाशरथे (छत्रपती संभाजीनगर ) यांचे गायन, विदूषी मंजूषा कुलकर्णी-पाटील ( पुणे ) यांचे गायन, पं. जयतीर्थ मेवुंडी (धारवाड) यांचे गायन आणि पं. राजा काळे ( मुंबई ) यांच्या गायनाने या शेवटच्या सत्राचा समारोप होईल. महोत्सवात तबल्यावर पं. अरविंदकुमार आझाद, पं. मुकेश जाधव , ईशांत परांजपे , दुर्जय भौमिक, प्रशांत गाजरे, धनंजय जळगावकर, अनिरुद्ध देशपांडे, जगमित्र लिंगाडे, प्रसन्न देशपांडे, कृष्णा चौधरी हे साथ संगत करणार आहेत. संवादिनीवर सुयोग कुंडलकर, लीलाधर चक्रदेव, शांतिभूषण देशपांडे, केदार देशमुख, मंगेश जवळेकर, यश खडके हे साथ संगत करणार आहेत. पखवाजवर विश्वेश्वर जोशी यांची साथ असेल. या संगीत महोत्सवाचा रसिक, नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य संयोजक अरविंद जळगावकर यांनी समर्थ सांस्कृतिक मंडळ आणि देवगिरी संगीत प्रतिष्ठानच्या वतीने केले आहे.

## संजय मोरे यांना दिल्लीत मिलियनेयर फार्मर ऑफ इंडिया अवार्ड प्रदान



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** कृषी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी ग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख संजय मोरे यांना प्रमुख ग्री मीडिया हाउस कृषि जागरण द्वारा आयोजित, भारतीय कृषि अनुसंधान परिषद सह आयोजक व महिंद्रा ट्रैक्टर्स द्वारा प्रायोजित मिलियनेयर फार्मर ऑफ इंडिया अवार्ड्स-२०२४ मान्यवरांच्या हस्ते देश व देशाबाहेरील शेतकऱ्यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. हा भव्य कार्यक्रम सोमवार दि.२ डिसेंबर रोजी भारतीय कृषी संशोधन संस्था मैदान पूसा, नवी दिल्ली येथे आयोजित केला गेला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथि म्हणून केंद्रीय कृषी व किसान कल्याण राज्यमंत्री कैलाश चौधरी, कृषी जागरणचे संस्थापक व प्रधान संपादक एम. सी. डॉमिनिक यांच्यासह देशपातळीवरील असंख्य शास्त्रज्ञ उपस्थित होते. सदरील पुरस्कार मिळाल्याबद्दल संजय मोरे यांचे कृषी विज्ञान केंद्र, बदनापूर, खरपूडी, छत्रपती संभाजीनगर, कृषी विभाग व ग्रोव्हिजन गटशेती संघातील सदस्यांसह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

## राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे संस्थापक अध्यक्ष माननीय संजयजी लहाने सर यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक फलटणकर सर यांनी केले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. संजयजी लहाने सर यांनी महापरिनिर्वाण दिनाविषयी मुलांना या दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगताना म्हणाले की. विश्वरत्न, भारतरत्न, प्रज्ञासूत्र, क्रांतिसूर्य, भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव, परमपूज्य, बोधिसत्त्व , डॉ .बाबासाहेब आंबेडकर देशात एकता, समता, बंधुता नांदावी म्हणून आयुष्यभर झटणाऱ्या महामानवाला महापरिनिर्वाण दिनानिमित्त कोटी कोटी प्रणाम!! त्यानंतर शाळेतील विद्यार्थी यांनी आपल्या भाषणातून मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भावेश कांबळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन शाळेतील रणवीर म्हस्के यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षक विनोद उबरहंडे, अमोल तेलंग्रे, नवाज शेख, दत्तात्रय गाडेकर, कृष्णा बनकर, शरद राजभोज, भागवत लहाने, विनोद धवलीया, वनिता बोडखे, रोहिणी सोळुंके, सविता बकाल, स्नेहल रिंढे, सुनीता मोरे, अश्विनी दुनगहु, विमल मदन, केशव पंडितकर, बाळू चव्हाण, अंकुश जोशी इत्यादींची उपस्थिती होती.

## सिद्धार्थ महाविद्यालयात ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८वा महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. सुनील मेढे हे होते तर प्रमुख वक्ते प्राध्यापक संजय साळवे यांचे मार्गदर्शन लाभले. व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. श्याम सर्जे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. अनिल वैद्य यांनी सामूहिक त्रिशरण पंचशील ग्रहण करून कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रमुख वक्ते प्रा. साळवे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकताना त्यांचे विविध पैलू उलगडून सांगितले. बाबासाहेबांनी समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता या मूलतत्त्वावर जागतिक स्तरावर आपल्या विचारांचा ठसा उमटविला सामाजिक, राजकीय, आर्थिक दूरदृष्टीने आजही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समाजमान्य असून त्यावरच भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावरही बाबासाहेबांच्या विचारांचे अनुकरण केले जाते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विश्वरत्न या नावाने संबोधले जाते.

यावेळी प्रा. अनिल वैद्य यांनीही आपले विचार मंडताना असे सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दलितांचे कैवारी आरक्षणाचे पुरस्कर्ते किंवा भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार एवढ्या पुरतेच मर्यादित न ठेवता डॉ. बाबासाहेबांचे शैक्षणिक कार्य कामगार, स्त्रिया, शेती विषयक धोरण, आर्थिक ध्येयधोरणे, जलनीती, सामाजिक कार्य, कायदेविषयक कार्य अशा घटकांसाठी जे कार्य करून ठेवलेले आहे त्याच कार्यांच्या आधारे आज भारतातील नागरिकांचे अधिकार अबाधित असल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे राष्ट्रनिर्माते होते असे सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्रो. डॉ. सुनील मेढे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनाच्या अंतिम समईच्या परिस्थितीचा उलगडा केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एम.जी मोरे यांनी केले तर आभार प्रा. सुनंदा सोनुने यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.




## रोटरी रेनबोचा स्पोर्ट्स कार्निवल उत्साहात

**जालना । प्रतिनिधी -** रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोतर्फे यंदा प्रथमच क्लबचे सदस्य आणि त्यांच्या परिवारासाठी बॉक्स क्रिकेट, बॅडमिंटन व बुद्धिबळ या खेळांचा समावेश असलेल्या स्पोर्ट्स कार्निवलचे आयोजन करण्यात आले होते.

जालन्यातील केनिया टर्फवर स्पोर्ट कार्निवल पार पडला. बॉक्स क्रिकेटमध्ये ९ संघांनी सहभाग नोंदवला. त्यात केसरिया किंग्स प्रथम, हमारा बजाज द्वितीय तर मंत्री मास्टर या संघाने तृतीय क्रमांकाचे बक्षीस पटकावले. डॉ. आशिष राठोड यांना उत्कृष्ट फलंदाज म्हणून गौरण्यात आले. बॅडमिंटन वरिष्ठ गटात रोटरी रेनबोचे अध्यक्ष महेश माळी प्रथम आणि विनोद गिंदोडिया यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.




१८ ते ४५ वयोगटात प्रथम कल्पेश लड्डा व द्वितीय प्रितेश मालपाणी हे ठरले. १८ वर्षाखालील गटात मानस आबड विजेता तर आर्यन वासवानी उपविजेता ठरला.

बुद्धिबळ स्पर्धेत वरिष्ठ गटात विराज देशपांडे प्रथम, नितीन अग्रवाल द्वितीय तर दीपाली राठी तृतीय आल्या. लहान गटात मानस आबडने बाजी मारली तर अमोघ मानधने उपविजेता ठरला.

या स्पोर्ट कार्निवलचे प्रायोजक सिद्धिविनायक सेक्युरिटीज होते तर संघाचे प्रायोजक रेनबोच्या सौ. निर्मला साबु, डॉ. आरती मंत्री, डॉ. दीपक मंत्री, डॉ. नितीन खंडेलवाल, डॉ. सुमित्रा गादिया, संजय राठी, सुनील बजाज, सौ स्मिता भककड, डॉ. प्रशांत पळणीटकर, विवेक मणियार हे होते.

कार्निवलच्या यशस्वीतेसाठी रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोचे अध्यक्ष महेश माळी आणि सचिव गौरव करवा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प प्रमुख संदीप राठी, अनुप जिंदल, प्रितेश अग्रवाल, कैलास तोष्णीवाल आदींनी परिश्रम घेतले.

## परस बागेतील पिकवलेला भाजीपाला शालेय पोषण आहारामध्ये प्रत्यक्ष वापर

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील कै. मारोतराव देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात परसबाग निर्माण करण्यात आलेली आहे. ही परसबाग मागील वर्षापासून स्वच्छ शाळा सुंदर शाळा च्या माध्यमातून निर्माण करण्यात आले असून याच परसबागेमुळे मागील वर्षी या शाळेला द्वितीय क्रमांक मिळाला होता. या परसबागेमध्ये गोबी,टमाटे,वांगी, सांबार इत्यादी भाजीपाल्याची लागवड केलेली असून सुंदर अशी परसबाग शाळेचा खर्च सुंदर करण्यामध्ये हातभार लावत आहे. विशेष म्हणजे याच परसबागेतील विविध फळ फळामुळे भाजीपाला ह्या विद्यार्थ्यांच्या दररोजच्या शालेय पोषण आहारामध्ये प्रत्यक्ष परसबागेतील पिकवलेला भाजीपाला याचा वापर होत आहे. भाजीपाला त्यांच्या शालेय पोषण आहारात मिळत असल्याने विद्यार्थी आनंदी असून. या शाळेचा टीमवर्क अत्यंत चांगल्या दर्जाचा आहे. विद्यालयाचे मुख्याध्यापक समाधान दुनगहु, तसेच सर्व शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी यासाठी परिश्रम घेत आहे. त्यांच्या या शाळेचा परिसर अतिशय सुंदर झालेला आहे.



# परतूर विधानसभा मतदारसंघात रमाई आवास योजनेतून २१६० घरकुल होणार मंजूर

## आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नाला यश

**जालना । प्रतिनिधी -** ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या बेघर व्यक्तींना निवारा उपलब्ध व्हावा या हेतूने रमाई आवास योजना (ग्रामीण) ही म हत्त्वकांक्षी योजना महाराष्ट्र राज्यभरात राज्य सरकार राबवत आहे.

या योजनेच्या लाभापासून एकही लाभार्थी वंचित राहणार नाही यांची दक्षता म्हणून महाराष्ट्र राज्याचे म ाजी मंत्री परतूर विधानसभा मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी मंठा परतूर व तहसील कार्यालयात आढावा बैठकी घेऊन परतूर विधानसभा मतदार संघातील मंठा परतूर व जालना तालुक्यातील मंठा परतूर व जालना या तिन्ही पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांसह गावागावातील ग्रामसेवकांना सूचना देऊन आपापल्या



गावातील प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन केले होते. या बाबतीत जिल्हाधिकारी जालना यांच्या जालनातही आढावा बैठक घेऊन संबंधित योजना जिल्हाभरात अतिशय प्रभावीपणे राबविण्याकरिता याबाबतचा शासनाकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्याचा आग्रह आमदार लोणीकर यांनी धरला होता.

आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नाने रमाई आवास योजनेतल्या मंजूर उद्दिष्टांपैकी आमदार बबनराव लोणीकर यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे जालना तालुक्यातील नेर सेवली सर्कल मधील १२० मंठा तालुक्यातील ८४० तर परतूर तालुक्यातील १२०० रमाई आवास योजनेतील घरकुलाची मागणी करण्यात आली होती. झालेल्या सदर मागणीप्रमाणे उद्दिष्ट मंजूर करण्यात आली असल्याची माहिती. महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांच्या कार्यालयातून प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकात दिली आहे. रमाई आवास योजने करिता पात्र



असलेला परतुर विधानसभा मतदारसंघातील कोणीही लाभार्थी सदरील योजनेपासून वंचित राहू नये. याकरिता गावागावातील भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वतः लक्ष घालून ग्राम सभा घेऊन पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याचे आवाहन देखील आम दार बबनराव लोणीकर यांनी केले आहे.

# जिल्हास्तरीय युवक महोत्सवमध्ये जेईएस लोककला विभागाचे यश



**जालना । प्रतिनिधी -** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व नेहरू युवा केंद्र जालना यांच्या संयुक्त विद्यमाने येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे आयोजित जिल्हास्तरीय युवक महोत्सवात जेईएस महाविद्यालयाच्या लोककला विभागाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

या महोत्सवामध्ये 'सामूहिक लोकगीत' या कला प्रकारांमध्ये लोककला विभागातील विद्यार्थ्यांनी जागरण या कला प्रकारामध्ये 'मल्हार घोड्यावर स्वार ... , मल्हारी देव माझा मल्हारी आदि पारंपरिक आणि प्रा. कल्याण उगले लिखित गाणी सादर केली. या सादरीकरणाला प्रेक्षकांनी उदंड प्रतिसाद दिला. या सादरीकरणाला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या परितोषिकाचे स्वरूप सन्मान चिन्ह ,प्रमाणपत्र व रोख रक्कम असे होते.

या सादरीकरणा मध्ये सोहेब शेख, अदित्य मुदिराज, आनंद घुले, ज्ञानेश उगले,प्रतीक्षा निकम, रुद्र पंडित, ओंकार सुलाखे, सिद्धार्थ संचेती,कुणाल पवार या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना लोककला विभाग प्रमुख प्रा. कल्याण उगले यांचे मार्गदर्शन मि ळाले.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री व मराठी विभाग प्रमुख डॉ. यशवंत सोनुने, कल्याण उगले यांनी विद्यार्थी कलावंतांचे कौतुक केले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.